# मेट्रो ३ मार्गावर एकाच टप्प्यात सलग ४ किमी भुयारीकरण पूर्ण

■ मुंबई

**कुलाबा**-वांद्रे-सीप्झ या 'मेट्रो ३' मार्गावर सीएसएमटी ते मुंबई सेंट्रलपर्यंत भुयारीकरणाचा २८ वा टप्पा यशस्वीरित्या पूर्ण झाला आहे. एकाच टप्प्यात सलग चार किलोमीटर अंतराचे भुयारीकरण करणारे वैतरणा २ हे 'मेट्रो ३'चे पहिले बोगदा खोदणारे यंत्र ठरले. 'मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन'द्वारे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते मुंबई सेंट्रलपर्यंतचा भुयारीकरणाचा महत्त्वाचा २८ वा टप्पा काल पार पडला. २६ महिन्यांमध्ये सलग चार किमी अंतराचे भुयारीकरण करण्यात आले. प्रतिदिन ६.३ मीटर वेगाने हे काम सुरु होते. पॅकेज २ च्या वैतरणा २ या टीबीएमद्वारे भुयारीकरणाला फेब्रुवारी २०१८ मध्ये सीएसएमटी लॉचिंग शाफ्ट येथून सुरुवात झाली होती. एकूण २७३० कॉंक्रीट रिंग्जचा वापर करत मेट्रो ३ मार्गिकेवरील मुंबई सेंट्रलपर्यंतचा सर्वात जास्त अंतराचा पल्ला वैतरणा २ टीबीएमने गाठला. कोरोना व्हायरसच्या साथीमुळे हे काम अधिकच आव्हानात्मक झाले होते. मात्र राज्य शासनाच्या सर्व मार्गदर्शन सूचनांचे कठोर पालन करुन शारीरिक अंतर ठेवत हे काम पूर्ण केले, अशी प्रतिक्रिया 'मेट्रो ३' मुंबई मेट्रो व्यवस्थापकीय संचालक रणजीत सिंह देओल यांनी दिली.